दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक–संजय पवार

## शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असले तरी, प्राथमिक माहितीनुसार काळजी करण्यासारखी कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगण्यात येत आहे. नियमित वैद्यकीय तपासणीसाठीच शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या काही महत्त्वाच्या चाचण्या सध्या सुरू आहेत.वाढते वय, सततचा प्रवास आणि राजकीय तसेच सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम लक्षात घेता डॉक्टरांनी नियमित आरोग्य तपासणीचा सल्ला दिला होता.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • बुधवार दि.२७ एप्रिल २०२६ • अंक-१२० • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# फडणवीस सरकारचा मोठा निर्णय विदर्भ-मराठवाड्यात उद्योगक्रांती

## राज्यात उभारले जाणार ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील विशाल प्रकल्प

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना देणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ८९,७३१ कोटींच्या ५ विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पांमुळे राज्यात सुमारे २० हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार असल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये हे उद्योग उभारले जाणार असून त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा आधार मिळणार आहे.

राज्यात हरित ऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी सरकारने हे मोठे पाऊल उचलले आहे. उद्योग विभागाच्या बैठकीत अदानी समूहासह ५ मोठ्या उद्योग कंपन्यांच्या प्रकल्पांना विशेष सवलती आणि प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्याच्या औद्योगिक धोरणाअंतर्गत सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून मोठ्या उद्योगांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. नवीन उद्योग उभारणीमुळे गुंतवणूक वाढावी, रोजगार निर्माण व्हावा आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था तयार व्हावी, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.या प्रकल्पांमुळे केवळ मोठ्या शहरांनाच नव्हे तर राज्यातील मागास आणि औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागांनाही फायदा होणार आहे. सरकारच्या माहितीनुसार, सहाय्यक उद्योग, वाहतूक व्यवस्था, पुरवठा साखळी आणि सेवा क्षेत्रामध्येही मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. लघु आणि मध्यम उद्योगांना याचा फायदा होईल, तसेच स्थानिक व्यवसायांनाही नवसंजीवनी मिळेल. विशेषतः तरुणांसाठी तांत्रिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होणार



असल्याने रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.नागपूर जिल्ह्यातील लिंगा-कळमेश्वर येथे अदानी एंटरप्रायझेस कंपनीकडून ७०,००० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. येथे कोल मायनिंग आणि गॅसिफिकेशन प्रकल्प उभारला जाणार असून या माध्यमातून सुमारे १० हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. हा प्रकल्प राज्यातील सर्वात मोठ्या औद्योगिक गुंतवणुकांपैकी एक मानला जात आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर येथे मेसर्स अक्षत ग्रीनटेक लिमिटेड कंपनी १२,५०० कोटींची गुंतवणूक करून सोलर सेल मॉड्युल उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पामुळे जवळपास ४ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.याशिवाय, मेसर्स एनएलएमके इंडिया कोटिंग कंपनी छत्रपती संभाजीनगर येथे ८४० कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून १५३ जणांना रोजगार मिळणार आहे. एचएस ह्युसंग इंडिया कंपनी नागपुरात १,७४० कोटींचा प्रकल्प उभारणार असून सुमारे ४०० रोजगार निर्माण होणार आहेत. तर गॅफाइट कंपनी नाशिकमध्ये ४,६५१ कोटींची गुंतवणूक करणार असून या प्रकल्पातून १,०६६ रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या सर्व प्रकल्पांमध्ये ऊर्जा, इलेक्ट्रिक स्टील, सोलर सेल, वेफर्स पॅनेल आणि आधुनिक औद्योगिक उत्पादन क्षेत्रांचा समावेश आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणी दोषींवर देशद्रोह आणि सदोष मनुष्यवध, मृत्युदंड गुन्हा दाखल करा–बबन भोईर

## दोषींची संपत्ती सरकार जमा करण्यात यावी

**पनवेल | प्रतिनिधी**

नीट पेपरफुटी प्रकरण अतिशय संवेदनशील व अत्यंत गंभीर असून असा प्रकाराला रोख लागला तर देशाचे उज्ज्वल भविष्य घडणार आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी चौकशी आयोग कायद्या अन्वये तपास करून (NEET UG 2026 PAPER LEAK) दोषीवर (आरोपीवर) देशद्रोह आणि सदोष मनुष्यवध, मृत्युदंड गुन्हा दाखल करण्यात येवून दोषीची (आरोपीची) सर्व संपत्ती मालमत्ता सरकार जमा करण्यात यावी अशी मागणी बबन गोपाळ भोईर यांनी गृहमंत्री भारत सरकार यांच्याकडे केली आहे.

यावेळी महत्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. यात नीट पेपर फुटीला जरब बसेल. आणि पेपर लीक करण्याची कोणाचीही हिंमतही होणार नाही.

१)या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करिता चौकशी आयोग कायदा १९५२ अन्वये चौकशी आयोग स्थापन करण्यत यावे असे निवेदन करण्यात येत आहे

(२) दोषीवर देशद्रोह भारतीय दंड संहिता कलम १२४ अ भारतीय न्याय संहिता कलम *१५२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात यावा.

(३) दोषीवर सदोष मनुष्यवध मृत्युदंड भारतीय दंड संहिता कलम २९९ कलम ३०४ भारतीय न्याय संहिता कलम १०५, कलम १०६ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात यावा.

(४) आत्महत्येस प्रवृत्त करणे भारतीय न्याय संहिता कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. (आय.पी.सी. कलम ३०६)

(५ ) या पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषीची (आरोपीची) संपत्ती, मालमत्ता, सरकारने तात्काळ सरकार जमा करण्यात यावी.

६) देशभरात २३ लाख विदयार्थी हे राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य आहेत नीटची परिक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या निरिक्षणाखाली व लष्कराच्या संरक्षणात घेण्यात यावी. वैदयकीय शिक्षणासाठी सर्वात महत्तवपूर्ण परिक्षा मानली जाते सर्वसामान्य कुटुंबातील लाखो विद्यार्थी परिश्रम करित असतात

७) या प्रकरणातील दोषींवर (आरोपी) मकोका संघटित टोळया या कायदया अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी.

८) या प्रकरणातील सर्व दोषीची (आरोपीची) मार्को टेस्ट करण्यात यावी तसेच सर्वांचे सीडीआर तपासण्यात यावेत.

नीट परिक्षा पेपरफुटी प्रकरण अतिशय संवदेनशील आणि अत्यंत गंभीर असून सदर परिक्षेसाठी देशभरातील २३ लाख विदयार्थी बसले होते. वैद्यकीय प्रवेशासाठी ही परिक्षा अत्यंत महत्वाची होती. असा नीट परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे देशभरात प्रचंड संतापाची लाट असून जनतेत प्रचंड आक्रोश आहे. याबाबत देशभरातील विविध राज्यात, प्रांत विविध संघटना, पक्ष संस्था यांच्या मार्फत आंदोलने, मोर्चा रास्ता रोको करण्यात येते आहेत. देशभरातील २३ लाख विदयार्थी, पालक, कुटुंब प्रचंड मानसिक तणावात असून ज्या मानसिक तणावातून आणि नैराश्यातून काही विदयार्थींनी आत्महत्या केल्याचे ही वृत्त आहे लाखो विदयार्थ्यांच्या भविष्याशी व स्वप्नांशी खेळ मांडला आहे.नीट परिक्षा पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती संपूर्ण राष्ट्रपातळीवर असून या प्रकरणाने संपूर्ण देश हादरले आहे. विदयार्थी प्रचंड मानसिक तणावात आहेत. न्यायिक चौकशी करण्याकामी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिश यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी आयोगाची स्थापना करण्यात यावी अशी देशभरातील तमाम जनतेची, पालकांची मागणी आहे. २३ लाख विदयार्थ्यांना, पालकांना, कुटुंबाना न्याय मिळण्यासाठी या संपूर्ण नीट परिक्षा पेपरफुटी प्रकरणाची पाळेमुळे शोधून काढून या प्रकरणात सहभागी असणाऱ्याचा शोध घेण्यासाठी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी, सखोल चौकशी होणे महत्तवाची आहे. त्याच बरोबर दोषींच (आरोपींचे ) समाजातील विविध स्वरांतील लोकांशी असलेले संबंध पाहता तपासावर कोणत्याही राजकीय किंवा बाहय दबाव येणार नाही न्यायिक चौकशी होणे गरजेचे आहे. निष्पक्षपणाने सखोल व सर्वकष तपास होण्याकामी चौकशी आयोग स्थापन करणे महत्वाचे आहे. या प्रकरणातील संपूर्ण जाळयाचा (रॅकेट) शोध घेणे आवश्यक आहे.या प्रकरणी चौकशी आयोग कायद्या १९५२ अन्वये 'चौकशी आयोग स्थापन करण्यात यावा व सर्व दोषीची (आरोपीची) सर्व संपत्ती सरकार जमा करण्यात यावी. दोषीवर कायदयाअन्वेय कठोरातील कठोर कारवाई व शिक्षा व्हावी. २३ लाख विद्यार्थी पालक यांना न्याय मिळावा, उज्ज्वल भारताच्या भवितव्या साठी सदर परिक्षा सुरक्षित, पारदर्शक घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निरिक्षणाखाली व लष्कराच्या संरक्षणात व्हावी अशी विनंतीही बबन भोईर यांनी केली आहे. याची प्रत मा. राष्ट्रपती, भारत सरकार, मा पंतप्रधान भारत सरकार, मा. शिक्षणमंत्री भारत सरकार, मा. अध्यक्ष एन.टी.ए. भारत सरकार यांना देण्यात आल्या आहेत.

# मिनी बांगलादेश म्हणून ओळख असलेला पुण्यातील बुधवार पेठ

**।।। अकरा महिन्यात १०३ बांगलादेशी अल्पवयीन मुली सह महिलांवर कारवाई ।।। बनावट कागदपत्रांद्वारे पुण्यात वास्तव्य ।।। बांगलादेशातून पुण्या आणून वेश्या व्यवसाय करण्याचा प्रकार ।।। पुण्यात बांगलादेशी संख्या सतत वाढत आहे ।।। बनावट आधारकार्ड ,पॅन कार्ड, रेशनकार्ड बनवत भारतात प्रवेश करत शेफ जागा म्हणून पुण्यात वास्तव्य ।।। फरासखाना पोलीस ठाणे यांचे दरवेळी उल्लेणिय कामगिरी ।।।**

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे तेथे काय उणे म्हणतात परंतू आता या शहराला सतत गालबोट लावण्याचा प्रकार केला जात आहे पुण्यातील बुधवार पेठ आता भारतातील बांगलादेश अशी ओळख करण्याचा प्रयन्त केला जात आहे दर महिन्याला फरासखाना पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखा कडून छापा टाकला जात आहे यात एक धक्का दायक प्रकार म्हणजे यांना बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड कोण बनवुन देतो या कारवाईत बांगलादेशी महिला ,मुले, अल्पवयीन मुली व मुलांना पकडले जात आहे या बांगलादेशी नशा भारतात आणावयाचे यांचे सुव्यवस्थीत पणे नियोजन करत आसाम, पश्चिम बंगाल, झारखंड ,उत्तरप्रदेश येथून बनावट कागदपत्रे तयार करून दिली जातात याचा पुण्याचा मास्टर माईंड सुमित चव्हाण असल्याची माहिती समोर येत आहे ही बाब पोलीसांच्या चौकशीत पुढे आलेली आहे पुणे , मुंबई, झारखंड, उत्तरप्रदेश, बिहार या विभागात अनेक एजंट,होरके यांची साखळी कार्यरत आहे हा बुधवार पेठ मधील बांगलादेशी यांचे वास्तव्य फार दिवसा पासून आहे परंतू यावर पोलिसांनी वेळीच लक्ष न दिल्या कारणाने यांची संख्या पुणे बुधवार पेठेत वाढलेली होती पोलीसा कडून कारवाई होते म्हणून यांनी शहरातील इतर ठिकाणी पलायन सुध्दा केलेले दिसते यात कोंढवा,सिंहगड, बाणेर, औंध,पाटील इस्टेट ,कोथरूड, येरवडा,वाघोली, लोणी काळभोर,हडपसर शिक्रापुर या ठिकाणी आपले बस्तान मांडल्याचे वृत्त आहे हे शहरात ईतर ठिकाणी पलायन केलेले बांगलादेशी यांना सहज घरे मिळत असल्याने आणि यांचे एजंट सोबत संपर्क असल्या कारणाने यांना देहविक्री बाबत समस्या येत नसल्याचा प्रकार सुद्धा पुढे येत आहे बुधवार पेठेतील बांगलादेशी यांची साखळी मोडीत काढण्या





साठी पौलीसांनी व्यापक पावले उचलण्याची तयारी केलेली दिसते पुण्यात बांगलादेशी बुधवार पेठेतील सापडले आहे यात अल्पवयीन मुली, महिला फरासखाना पोलीस ठाणे यांनी पकडले आहे बांगलादेशी नागरिकांना पुण्यात आणल्या नंतर यांना वास्तव्य करतांना कोणताही अडथळा येऊ नये म्हणून बनावट कागदपत्रे बनवित या महिलांना येथिल एजंट वेगवेगळ्या ठिकाणावरून भारतात आणतात यात बेंगलैर, मुंबई,आसाम,झारखंड , उत्तरप्रदेश या ठिकाणावरून पुण्यात आणतात कारणही तसेच आहे पुण्यात फार वर्षांपासून बिनदिक्कत राहण्याची सूरळीत जागा आहे या बांगलाशींना आधारकार्ड, पॅन कार्ड ,रेशन कार्ड ,बॅंकेत खाते ईतर ओळख कार्ड काढून देत असल्याचा प्रकार पुढे येत आहे या महिलांना बांगलादेश मधून नोकरीचे अमीश देऊन बुधवार पेठेतील कुंटण - खाण्यात डांबून यांच्या कडून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जाते पुण्यातील बुधवार पेठ मंदिर हा प्रकार अनेक वर्षा पासून सुरू आहे यात पुर्वी पासून पोलीसांचे अर्थकारणात मुळे आपल्या पुण्याला बांगलादेशीचे वास्तव्याचे भोग भोगावे लागत आहे आता कारवाई केली जात असली तरी या पुर्वी ही कारवाई होणे गरजेचे होते बुधवार पेठेत पोलीसा कडून कारवाई होत असल्या कारणाने येथिल बांगलादेशी रहिवाश्यांना एजंटांनी ईतर ठिकाणी स्थलांतरीत केल्याचे वृत्त समोर येत आहे पुणे पोलीसांनी गेल्या दोन वर्षांत बांगलादेशी विरोधात जोरदार मोहिम सुरू केलेली असली तरी गेल्या दोन वर्षा पासून पुण्यातील बुधवार पेठ मधील राहणारे बांगलादेशी ईतर ठिकाणी शहरात पळालेले दिसत आहे आता हे बांगलादेशी ईतर ठिकाणी बेकायदा राहण्यास गेलेले आहे हे बांगलादेशी इतके चतूर आहे यांच्या मोबाईल मध्ये एक विशिष्ट प डाऊनलोड करून त्या माध्यमातून बांगलादेशातील नातेवाईक ,ओळखीचे लोक, वेश्या व्यवसाय करून घेणारे एजंट यांच्याशी संपर्क करत असल्याचे वृत्त आहे याबाबत पुणे पोलीसांनी बांगलादेशीना यांना ताब्यात घेऊन नंतर मोबाईल तपासणी सखोल केल्यास यांचे कारनामे पुढे येऊ शकतात हे बांगलादेशी पुण्यात येऊन बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीयांशी विवाह करतात हा प्रकार सर्वंच ठिकाणी वाढत आहे पुण्यात २०२५ मध्ये बांगलादेशी १०४ चं होते काय ? शहरातील विविध भागात या बांगलादेशींनी डेरा मांडत बनावट कागदपत्रे तयार करून उच्छांद मांडलेला आहे सर्वात जास्त पुण्यात बांगलादेशी बुधवार पेठेत आहे तसेच कोंढवा , बाणेर,सिंहगड,कोथरूड ,वाघोली शिक्रापुर,शिरूर, पाटील इस्टेट , गोखलेनगर,पांडव नगर ,लोणी काळभोर,हडपसर येथे खोली भाड्याने घेऊन राहतात येथे वास्तव्यास राहून शहरासह देशातील इतर राज्यात बिनधास्त पुणे फिरतात तसेच हे येथे राहत असतांनाही बांगलादेश मध्ये सुध्दा जातात यावर शहरातील सर्वंच पोलीस ठाण्यातील अधिका-यांनी आपल्या क्षेत्रात खोली भाड्याने दिले आहे यांची सखोल माहिती जमा केली तर आणि खोली भाड्याने देणारे शासकिय नियमानूसार न देत असतील तर त्या ठिकाणच्या खोली भाड्याने देणा-यावर जागो जागी जाऊन स्वतः पाहणी करणे गरजेचे आहे कारण टिन शेड उभारून घरे भाड्याने अनलिगली देणारे महाभाग शहरात अनेक ठिकाणी आहे मग या ठिकाणी राहणारे ईतर ठिकाणी जाऊन भंगार व्यवसाय ,सलून व्यवसाय , मसाज पार्लरच्या नावावर वेश्या व्यवसाय ,पान टपरी उघडून अमली पदार्थ विक्री होत असल्याचा प्रकार पुढे येत आहे तर वेळीच यावर पायबंद न घातल्यास पुढील काळात शहराला यापेक्षा भोग भोगावे लागतील.

# अट्टल घरफोडी करणाऱ्या दोन आरोपींना अटक फरासखाणा पोलिसांची उल्लेखित कामगिरी

**।।। आरोपींनी वापरलेले मोटरसायकल,सोन्याचे दागिने असा एकूण माल १८४९४०० रूपयांचा माल हस्तगत ।।। फरासखाना पोलीस हवालदार गजानन सोनुने यांची उल्लेखनिय कामगिरी ।।।**

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे फरासखाना पोलीस ठाण्यात अंतर्गत येणा-या बंटी कॉर्नर बिल्डींग , दुसरा मजला फ्लॅट नंबर ३ पवळे चौक, कसबा पेठ पुणे या ठिकाणी चोरट्यांनी सेफ्टी दरवाजा कोयत्याने तोडून घरात प्रवेश करत कानातील बाळी , हातातील सोन्याचे मनी असलेले मनगंटा , रोख रक्कम ५०००० / रूपये असा एकुण माल ११०७४०० / रूपये किंमतीचा मुद्देमाल फिर्यादीचा माल घरफोडी करून चोरी केला होता त्यानुसार अज्ञात आरोपी विरोधात फरासखाना पोलीस ठाण्यात गुर नं ७२/ २०२३ भारतीय न्याय संहिता सन२०२३ चे कलम ३०५ (अ) , ३३१( ४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता

दाखल गुन्हा आणि यांचे गार्सिया लक्षात घेता पोलीस उपायुक्त कृषीकेश रावल यांनी फरासखाना प्रभारी प्रशांत भस्मे यांना आदेशीत करून तपास पथकातील पोलीस उप निरिक्षक अरविंद शिंदे पोलिस हवालदार नितील तेलंगे, पोलिस हवालदार ८४०३ गजानन सोनुने, पासलकर,राठोड,होळकर अशी टिम तयार करत त्यानंतर या टिमने खाजगी सीसीटीव्ही फुटेज चेक करत यांचा शोध घेत असतांना पोलिस हवालदार गजानन सोनुने यांनी सदरच्या आरोपीला ओळखल्या नंतर प्राप्त पत्यावर जाऊन त्याचा शोध घेतला असता या आरोपीला पोलिसांची भनक लागल्याने ते पसार झाले व यांनी वेळोवेळी राहण्याचा ठिकाण बदलत दिल्ली, अयोध्या, आग्रा,झाशी, लातूर,बार्शी, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी फिरत असतांना त्यांना छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतल्या नंतर सदर गुन्ह्याचा तपास पोलिस हवालदार फरासखाना पोलीस ठाणे गजानन सोनुने यांच्या कडे दिल्या नंतर त्यांनी आरोपी १) चंद्रकांत उर्फ चंद्या अनंत




माने वय ३३ वर्षे राहणार वेताळ नगर झोपडपट्टी चिंचवड गाव चिंचवड पुणे, २ ) रामा उर्फ रामजाने लक्ष्मण क्षिरसागर वय३३ वर्षे राहणार गौर वापोली तालूका कळंब जिल्हा धाराशिव यांना छत्रपती संभाजीनगर येथून वर्ग करून त्यांना अटक करण्यात आली यांनी गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल ,दरवाजा तोडण्या साठी वापरलेले साहित्य तसेच १३०, ३०० ग्रॅम वजनाचे सोने असा सर्व माल १८४९४००/ रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात फरासखाना पोलीस ठाण्यातील तपास पथकातील अधिकारी ,पोलीस अंमलदार यांना यश आले एक विशेष म्हणजे दाखल गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन सोनुने पोलीस हवालदार बक्कल नंबर ८४०३ हे करत आहे सदर कामगिरी अमितेश कूमार पोलिस आयुक्त ,प्रविण दराडे पोलीस सह आयुक्त तसेच कृषीकेश रावले पोलीस उप- आयुक्त परि-१ पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरिक्षक प्रशांत भस्मे फरासखाना पोलिस ठाणे ,पोलीस अंमलदार नितिन तेलंगे ,गजानन सोनुने, महेश राठोड,पासलकर,शिंदे,जाधव,पवार, होळकर ईतर कर्मचारी यांनी केली आहे.

दैनिक लोकांकीत



# भिगवणच्या डॉ.तृप्ती गावडे–काळे यांची उल्लेखनीय कामगिरी; २०० महिलांवरील संशोधनाला यश

## प्रसूती वेदना कमी करण्यासाठी आयुर्वेदिक उपचार पद्धती यशस्वी; डॉ.तृप्ती गावडे–काळे यांना पीएच.डी

**भिगवन । अरुण भोई**

भिगवन येथील 'मोरया मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल'च्या स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. तृप्ती गावडे–काळे यांना आयुर्वेद क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली आहे. नैसर्गिक प्रसूतीचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि सिझरियन शस्त्रक्रिया कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या संशोधनाची वैद्यकीय क्षेत्रात मोठी दखल घेतली जात आहे.



आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे गर्भवती महिलांमध्ये नॉर्मल डिलिव्हरीचे प्रमाण घटत असून, सिझरियन शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर हडपसर येथील सुमतीभाई शहा आयुर्वेद महाविद्यालयात डॉ. तृप्ती गावडे–काळे यांनी एरंड तेल पिचू या आयुर्वेदिक उपचार पद्धतीवर संशोधन केले. या संशोधनांतर्गत जवळपास २०० गर्भवती महिलांवर उपचार करण्यात आले. गर्भधारणेच्या आठव्या व नवव्या महिन्यात एक दिवसाआड एरंडेल तेलात भिजवलेला कापसाचा बोळा योनीमार्गात ठेवण्याची प्रक्रिया करण्यात आली. या उपचारामुळे प्रसूतीच्या वेळी गर्भाशयाचे मुख मऊ होण्यास व वेळेत उघडण्यास मदत झाली. परिणामी प्रसूती वेदना कमी होऊन महिलांची नैसर्गिक व सुलभ प्रसूती होण्यास मोठी मदत झाल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले.

डॉ. तृप्ती गावडे–काळे सध्या भिगवन येथील 'मोरया हॉस्पिटल'मध्ये सेवा देत असून, ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना त्यांच्या अनुभवाचा व संशोधनाचा मोठा लाभ होत आहे. सिझरियनचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि मातांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांचे संशोधन महत्त्वपूर्ण ठरत असल्याची भावना वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. तृप्ती गावडे–काळे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत उरण तालुक्या मधून ग्रुप ग्रामपंचायत जासईचा द्वितीय क्रमांक

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत जासईने केलेल्या सर्वच लोककल्याण कारी कार्याची व जनतेच्या सर्वांगीण विकासाची कार्ये लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत जासईला उरण तालुक्यातून दुसरा क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ग्रुप ग्रामपंचायत जासईच्या कार्याचा गौरव करत दुसरा क्रमांक देऊन त्यांचा सन्मान केला आहे.ग्रुप ग्रामपंचायत जासईने सर्वच घटकासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविले आहेत. अनेक विकासकामे केली आहेत त्यामुळे त्यांना हा उरण तालुक्या मध्ये दुसरा क्रमांक मिळाला आहे.अभियान अंतर्गत दुसरा क्रमांक मिळाल्याने ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांवर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.अभिमानास्पद व गौरवास्पद कामगिरी ग्रुप ग्रामपंचायत जासईच्या माध्यमातून झाली असून जासईचे सरपंच संतोष रामचंद्र घरत यांचा नेतृत्वाखाली जासई ग्रुप ग्रामपंचायतीने महाराष्ट्र शासन अंतर्गत राबविण्यात आलेल्या मूख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान मध्ये उरण तालूक्यात दूसरा क्रमांक पटकविला आहे.बक्षिसपात्र रक्कम–१२ लाख ग्रामपंचायतला मिळणार आहे. ग्रामपंचायत जासई चे व्याप्ती व कारभार मोठा असलं तरी या अभियान मध्ये सर्व घटक परिपूर्ण करून अभियान यशस्वी करण्यासाठी महत्वाचे योगदान देणाऱ्या सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांचे सर्व स्तरातुन कौतुक केले जात आहे.मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी राबविण्यात येणारे एक महत्त्वाकांक्षी अभियान आहेद्व स्थानिक स्वराज्य संस्थांना (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती) कार्यक्षम बनवणे आणि शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हा याचा मुख्य उद्देश आहे.या अभियानांतर्गत स्थानिक संस्थांच्या कामाचे मूल्यमापन केले जाते.ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभाग वाढवणे, कर वसुली, आणि डिजिटल सेवांचा वापर यांसारख्या निकषांवर आधारित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांचा गौरव केला जातो. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे, प्रशासनात पारदर्शकता आणणे आणि ग्रामीण नागरिकांना सुलभ व गतिमान सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांचा विकास करणे, कोणतेही समस्या निर्माण झाल्यास ते त्वरित सोडविणे आदी विविध कार्य उरण तालुक्यातील जासई ग्रामपंचायतच्या माध्यमातून नेहमी करण्यात येते.हे सर्व ग्रामपंचायतचे कार्य लक्षात घेऊन त्यांच्या कार्याची पोहोच पावती म्हणून शासनाने ग्रुप ग्रामपंचायत जासईला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तालुका स्तरीय दुसरा क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

# मंत्रालयात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे डॉ.हर्षदीप कांबळे यांनी दिली अधिकारी, कर्मचारी व मुंबईकरांना तंबाखूमुक्तीची शपथ

**मुंबई । नासिकेत पानसरे**

जागतिक तंबाखू विरोधी दिन निमित्ताने सामाजिक न्याय विभाग व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २६ मे २०२६ रोजी या प्रचार कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात करण्यात आले होते.



याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांच्या हस्ते सदर भव्य व्यसनमुक्ती पोस्टर्स प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुंबईकरांना संदेश दिला की, ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिन या दिवसाचे महत्त्व आज मोठ्या स्वरुपात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला आहे की, जर तंबाखूचे व्यसन थांबविले नाही तर सन २०२०ते २०३० पर्यंत जगातील सुमारे शंभर कोटी लोक तंबाखू पासून होणाऱ्या रोगांमुळे मृत्यू पावतील. त्यामध्ये २० ते ३० वर्षे वयोगटातील ४० टक्के लोक असू शकतात. म्हणून या आयोजनात सर्वांनी सहभागी होऊन स्वतःला तंबाखू पासून दूर ठेवण्याची शपथ उपस्थित आधिकारी व कर्मचारी यांना व्यसनमुक्तीची शपथ त्यांनी दिली.महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्यांनी २०११ साली व्यसनमुक्तीचे धोरण बनविले आहे. महाराष्ट्र सरकारने या निमित्ताने व्यसनमुक्त महाराष्ट्र च्या दिशेने पाऊल उचलावे असे आवाहन नशाबंदी मंडळाचे चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले. तसेच येणाऱ्या वर्षात शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल्स, धार्मिक स्थळे यांच्या १०० मीटर पासून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंद व्हावी या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती कायदा अंमलबजावणीची मोहीम नगरपालिका, नगरपरिषद यामध्ये मोहीम राबविण्यात येईल अशी माहिती मंडळाच्या वतीने चिटणीस / मुख्य संघटक अमोल स. भा. मडामे यांनी दिली. समाजकल्याण विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते कल्याणयात्रा–व्यसनमुक्तीच्या गाथा या मासिकाच्या मे २०२६ या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आयुक्त दिपा मुधोळ – मुंडे यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीच्या पोस्टर्स चे प्रकाशन करण्यात आले तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते उपस्थिततांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे व सामाजिक विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांनी स्टॉल ला भेट देऊन संस्थेचे स्वागत केले. ही प्रदर्शनी बघण्यासाठी येणारे कर्मचारी, अधिकारी व मुंबईकर यांचे लक्ष वेधुन घेऊन सर्वांना तंबाखूला नाही म्हणा असे संदेश देत होते. सदर कार्यक्रमाला नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सलाम मुंबई फाऊंडेशन, नरोत्तम सक्सेरिया फाऊंडेशन, सलाम बॉम्बे फाऊंडेशन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, के इ एम हॉस्पिटल, भरडावाडी हॉस्पिटल, मराठवाडा ग्रामीण विकास, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, वाशी, प्रजापिता ब्रम्हकुमारीज, सपोर्ट संस्था मुंबई या संस्थांनी सहभाग घेऊन कार्यक्रमात पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. तंबाखूजन्य कायद्याची माहिती दर्शविणारे कटआऊट, प्रदर्शनी, पोस्टर्स, पत्रकांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थ व विक्री कायदा २००३ चा प्रचार, प्रसार व अंमलबजावणीसाठी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी आपला सहभाग नोंदवत तंबाखू मतलब खल्लास तंबाखू मुक्त मुंबई महाराष्ट्र चा नारा देत तंबाखूजन्य पदार्थ पासून दूर राहण्याचा संकल्प केला.

# कर्जतमध्ये शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने साखळी उपोषण लेखी आश्वासन नंतर स्थगित

**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत-पनवेल जुना १५ मीटर (५० फूट) डीपी रोडचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने कर्जतमध्ये टिळक चौक येथे साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. या साखळी उपोषणाची नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने तुर्तास लेखी आश्वासन देऊन उपोषण स्थगित करण्यात आले.कर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आयोजित करण्यात आलेल्या साखळी उपोषणास नगरपरिषद प्रशासन व नगराध्यक्षा यांनी दुपारी भेट देऊन उपोषणकर्ते अॅड .भाऊसाहेब पुंजू मोरे यांच्या समस्या व मागण्या जाणून घेण्यात आल्या. संबंधित विषयांवर सकारात्मक चर्चा करून संबंधित विभागाशी समन्वय साधण्यात आला व योग्य तो तोडगा काढत लेखी आश्वासन देऊन उपोषण यशस्वीरित्या सोडविण्यात आले.यावेळी कर्जत नगरपरिषद नगराध्यक्षा पुष्पाताई दगडे, उपनगराध्यक्ष संतोषजी पाटील, कर्जत नगरपरिषद नगरसेवक तथा बांधकाम सभापती महेंद्र बबन चंदन पाटील, नगरसेवक बाबू पाटील, नगरसेविका मानसी कानिटकर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या उपोषणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत शहराध्यक्ष अॅड. भाऊसाहेब मोरे, शहर उपाध्यक्ष राम देशमुख आणि शहर सचिव दिलीप बुंधाटे सहभागी झाले आहेत.



# ठाण्यात अवैधरित्या डम्पिंग करणाऱ्या वाहनांवर पालिकेची कारवाई



**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कोलशेत परिसरात अवैधरित्या डेब्रीचे डम्पिंग करणाऱ्या वाहनांवर आज कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान संबंधित वाहन चालकांकडून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तब्बल ६० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. कोलशेत परिसरात काही वाहनांकडून अनधिकृतपणे डेब्री टाकण्यात येत असल्याची माहिती महानगरपालिकेला प्राप्त झाली होती. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने संबंधित ठिकाणी पाहणी करून कारवाई केली. अवैध डम्पिंगमुळे परिसराच्या स्वच्छतेवर तसेच पर्यावरणावर परिणाम होत असल्याने ही कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, अभियंता किशोर गुळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक साईराज कांबळे, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक चारु गोटे, स्वच्छता निरीक्षक सुमित जाधव यांनी केली. यावेळी जप्त करण्यात आलेले डेब्री पुढील प्रक्रिया करण्यासाठी अधिकृत प्रकल्पाकडे पाठवण्यात आले. तसेच शहरात अवैधरित्या डेब्री टाकणाऱ्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला.

# पत्रकारांसाठी हक्काचा आमदार मिळावा;AJFC संघटनेची मागणी

**मुंबई । सत्यवान विचारे**

पत्रकारांच्या विविध प्रश्नांना सभागृहात न्याय मिळावा आणि त्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडल्या जाव्यात, यासाठी पत्रकारांना स्वतंत्र हक्काचा आमदार मिळावा, अशी मागणी ऑल जर्नलिस्ट अँड फ्रेंड सर्कल (AJFC) संघटनेचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष ०सत्यवान विचारे यांनी केली आहे.

प्रत्येक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणारे आमदार सभागृहात असतात. शेतकरी, कामगार, शिक्षक, उद्योग क्षेत्रातील प्रश्न मांडण्यासाठी विविध प्रतिनिधी असतात; मात्र लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र प्रतिनिधित्व का नसावे, असा सवाल AJFC या राष्ट्रीय स्तरावर नोंदणीकृत पत्रकार संघटनेने उपस्थित केला आहे.

पत्रकारांना काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ग्रामीण भागातील पत्रकारांच्या सुरक्षेपासून ते मानधन, शासकीय सुविधा, निवास, आरोग्य विमा आणि कायदेशीर संरक्षण अशा विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सभागृहात पत्रकारांचा आवाज पोहोचणे आवश्यक असल्याचेही संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. AJFC संघटनेने पत्रकारांसाठी स्वतंत्र प्रतिनिधित्वाची संकल्पना गांभीर्याने विचारात घेऊन शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

# ठाण्यातील गावदेवी भाजी मंडईची महापौरांसह अधिकाऱ्यांची पाहणी

**संतोष पडवळ । ठाणे**

गावदेवी भाजी मंडई येथे गुरुवारी लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी भाजी मंडई येथे पाहणी केली. गावदेवी भाजी मंडई येथे लागलेली आग ही मोठ्या प्रमाणात लागल्याने नुकसानही बरेच झाले आहे. या ठिकाणच्या गाळेधारकांना १ जून पर्यंत पुनर्वसन करण्यात येईल असे सांगितले होते, परंतु आज प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कामाचा आवाका हा मोठ्या प्रमाणात असून काम हे तांत्रिक दृष्ट्या करण्याच्या दृष्टीकोनातून आणखी काही कालावधी लागेल व सुस्थितीतील गाळे येथील गाळेधारकांना देण्यात येतील असे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले.



या पाहणी दौऱ्यास सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक राम रेपाळे, स्थानिक नगरसेवक संजय वाघुले, सुनेश जोशी, नगरसेविका मृणाल पेंडसे, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके, डॉ मिताली संचेती, उपनगर अभियंता शुभांगी केसवाणी, सहायक आयुक्त महेशकुमार जामनोर, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीष झळके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्यासह सर्व पदाधिकारी व अधिकारी यांनी गावदेवी भाजी मंडईची अंतर्गत पाहणी केली. तसेच पहिल्या मजल्यावर असलेल्या नौपाडा प्रभाग समिती कार्यालयाची देखील पाहणी केली. हे कार्यालय सुस्थितीत करण्याच्या सूचना महापौरांनी यावेळी दिल्या. सद्यस्थितीत सर्व डेब्रीज काढण्याचे व स्थापत्यसंलग्न काम सुरू आहे. महापालिकेची संपूर्ण यंत्रणा पूर्ण क्षमतेने साफसफाईचे व इतर संलग्न काम करीत असून सर्व गाळे सुस्थितीत करण्यासाठी आणखी काही दिवस लागणार असल्याचे महापौरांनी येथे उपस्थित असलेल्या भाजी विक्रेत्यांशी संवाद साधताना नमूद केले. गावदेवी भाजी मंडई येथील कामकाज सुरू असताना प्रत्यक्ष पाहणी करुन स्थानिक नगरसेवकांनी कामकाजाबाबत मार्गदर्शन करावे असेही महापौरांनी नमूद केले.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)